# सुसंस्कृतपणाचा आव

**विशेष संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडे**

भाजपाने गोवा, कर्नाटक, काश्मीर अशा अनेक राज्यांत सत्तेवर येण्यासाठी साम, दाम, दंड, भेद याचा पुरेपूर वापर केला. मित्रपक्षाला वापरून लाथाडणे, विरोधकांच्या अंगावर ईडीला सोडणे, इतर पक्षांचे आमदार फोडणे या प्रकारांचा भाजपाने सातत्याने वापर केला. आता महाराष्ट्रात मात्र त्यांना हे करताच येत नसल्याने त्यांची कोंडी झाली आहे. भाजपाने शिवसेना, राष्ट्रवादी किंवा काँग्रेस या पक्षाचे आमदार फोडण्याचा प्रयत्न केला नसेल हे अशक्य आहे. मात्र पक्षांतर कायदा लागला असल्यामुळे एखादा आमदार फोडला तर त्याची आमदारकी जाईल आणि त्याला परत निवडणुकीला सामोरे जावे लागेल. महाराष्ट्राच्या जनतेने अशांना नुकताच धडा शिकवत पराभूत केले आहे. त्यामुळे कोणताही आमदार हा धोका पत्करणार नाही. यामुळे भाजपाकडे कोणत्याही पक्षाचे दोनतृतीयांश आमदार फोडणे हा एकच पर्याय शिल्लक होता. दोनतृतीयांश आमदार फोडून त्यांचा वेगळा गट स्थापन केला तर त्या फुटीर आमदारांची आमदारकी टिकते. असा गट भाजपाला पाठिंबा देऊ शकतो. मात्र भाजपाला महाराष्ट्रात उतरती कळा लागली असल्याने या वेळेस भाजपाला या प्रयत्नात यश आले नसावे. परिणामी १८ अपक्षांना आपल्या बाजूने ओढल्यानंतर पुढील फोडाफोडीच्या राजकारणात भाजपाची सपशेल हार झाली आहे. भाजपा व मित्र पक्षांचे १०५ आमदार आणि भाजपाला पाठिंबा देणारे १८ अपक्ष आमदार मिळून भाजपाकडे केवळ १२३ आमदारांची संख्या आहे. बहुमताचा १४५ चा आकडा गाठणे भाजपाला केवळ अशक्य आहे. या एकाच कारणामुळे भाजपाने सत्ता स्थापनेचा दावा केलेला नाही. मात्र आपण फारच सुसंस्कृत आहोत असा आव आणत भाजपाचे नेते एकामागे एक वक्तव्य करीत आहेत. आम्ही आमदार फोडणार नाही, मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांना प्रचारावेळी पुढे आणल्याने जनतेने महायुतीला कौल दिला असल्याने दुसरा पर्याय सुचविणे हा जनतेचा अपमान आहे, जनतेने महायुतीला कौल दिला आहे, पर्यायी सरकार सत्तेवर आले तरी ते स्थिर सरकार असणार नाही. अशा प्रकारची वक्तव्ये करून आपले अपयश झाकण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे. महाराष्ट्रात पैशाचा आणि सत्तेचा वापर करूनही आता एकही आमदार फोडता येणार नाही हे लक्षात आल्यानेच अमित शहा हे महाराष्ट्रात फिरकलेले नाहीत. मात्र केंद्रीय नेतृत्त्व राज्यात रिमोट कंट्रोल चालवत नाहीत, असा फसवा युक्तिवाद याबाबतही भाजपाने चालवला आहे. प्रत्यक्षात भाजपाला एक अंश जरी शक्य असते तर भाजपाने सर्व प्रकार वापरून सरकार स्थापन केले असते हे भाजपाच्या इतिहासावरूनच सर्वांना माहीत आहे. पहिल्यांदाच भाजपा हतबल झाला आहे.

भाजपाचे नेते आणि आमदार हे पत्रकारांसमोर येतात किंवा वाहिन्यांवर येतात तेव्हा नेमके काय बोलायचे हे त्यांचे आधीच ठरलेले असते. कुणी कोणत्या पत्रकाराला गाठायचे आणि 'तुला विशेष बातमी देतो' अशी फसवणूक करीत पाहिजे त्या दिशेने हवा फिरेल अशा तऱ्हेने बातम्या सोडायच्या ही भाजपाची रणनीति असते. हाच प्रकार आज दिसला. आज कोअर कमिटीची पहिली बैठक झाल्यावर भाजपाचे राम कदम, अमर साबळे हे वेगवेगळ्या वाहिन्यांवर आले आणि शिवसेना दोषी दिसेल अशा तऱ्हेचे वक्तव्य ठरवून सुरू केले. शेतकऱ्यांची वाईट स्थिती असल्याने स्थिर सरकार हवे, महायुती नसेल तर स्थिर सरकार राहणार नाही असे वक्तव्य करू लागले. हीच भाजपा पावसाने थैमान घातले असताना महाजनादेश यात्रेत प्रचार करण्यात मश्गुल होती. मुख्यमंत्री फडणवीस हे सर्वात लाडके आहेत असेही म्हटले, पण तरीही त्यांना पूर्ण बहुमत जनतेने दिले नाही हे वास्तव आहे. झपाट्याने इन्कमिंग करूनही भाजपाला जादुई आकडा गाठता आला नाही. सगळं असूनही केवळ अरेरावीने सरकार चालविल्याने भाजपाने सर्व गमावले.